**नियमीत दिवाणी दावा क्र. ६५१/२०२३**

रेखाबाई गुळुमकर वि. जिल्हाधिकारी वगैरे

**<u>निशाणी ८५ खालील आदेश</u>**

वादीने कोर्ट कमिशन अहवालात दुरुस्ती करण्यासाठी अर्ज दिला आहे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, कोर्ट कमिशन अहवाल व नकाशामध्ये लिहिलेला मजकुर चुकीचा आहे. नकाशामध्ये दाखविलेले गुळुमकर यांची वस्ती निंबाळकर यांची वस्ती दाखविली आहे. ज्या ठिकाणी निंबाळकर वस्ती दाखवायची त्या ठिकाणी गुळुमकर यांची वस्ती दाखविली आहे. तसेच ज्या ठिकाणी गुळुमकरची वस्ती दाखवयाची होती त्या ठिकाणी निंबाळकरची वस्ती दाखविली आहे. नकाशात दाखविलेली चारी ही नकाशात दाखविलेल्या विहीर व गमे वस्ती यांच्या ठिकाणी दाखविणे जरुरी आहे. सदर विहीर निंबाळकर वस्तीच्या दक्षिण बाजुस दाखविणे जरुरी आहे. चारी ही विहीरीच्या ठिकाणी व विहीर ही चारीच्या ठिकाणी दाखविणे जरुर आहे. वस्तीवर दाखविलेला सांडवा हा गुळुमकर वस्तीच्या जवळ मध्यंतरी दाखविणे जरुरी आहे. तसेच रस्त्याचे काम पश्चिमेकडुन पुर्वेकडे १६०० मीटर पुर्ण झाले आहे असे लिहणे जरुरी आहे. त्या ठिकाणी पुर्व–पश्चिम जुनी ताल आहे व मध्यंतरी पाण्याचा सांडवा आहे असे लिहणे जरुरी आहे. लालासाहेब चंदनशिवे,

भगवान चंदनशिवे व घोगरे यांची घरे व विहीर दाखविली नाही. रस्ता हा जांबुड हद्दीतुन जातो व विठ्ठलवाडी हद्दीतुन जात नाही. तो विठ्ठलवाडी हद्दीतुन जातो असे दाखविणे गरजेचे आहे. त्यामुळे झालेल्या चुका दुरुस्त करण्यासाठी नवीन रिपोर्ट दाखल करण्याचा कोर्ट कमिशनरला आदेशीत करावे.

३. प्रतिवादी क्र.२ ने त्यांचे म्हणणे निशाणी क्र.८८ वर दाखल केले आहे. सदर रस्ता हा पश्चिमेकडुन पुर्वेकडे १६०० मीटर पुर्ण झालेला आहे व त्यावर डांबरीकरण झालेले आहे. उर्वरित १७०० मीटर लांबीमध्ये खडीकरणाचे, मुरमीकरणाचे ३ स्तर पुर्ण झाले आहेत. डांबरीकरणाचे काम फक्त त्यावर बाकी आहे.

४. कोर्ट कमिशनर यांनी त्यांचे महणणे निशाणी क्र.८९ वर दाखल केले आहे. त्यांचे म्हणणे आहे की हा अर्ज खरा नाही. वादी–प्रतिवादी यांनी दाखविल्याप्रमाणे दिसुन आलेल्या परिस्थितीचा हातनकाशा दाखल केला आहे. नकाशात फक्त नजरचुकीने गुळुमकर वस्तीच्या ठिकाणी निंबाळकर वस्ती असे नमुद आहे. एवढीच तांत्रीक चुक आहे. बाकी अहवालात वस्तुस्थिती दर्शविली आहे. कमिशनच्या वेळी वादी–प्रतिवादी व त्यांच्या वकिलांनी समक्ष माहिती दिली आहे. त्यानुसार कमिशनचे काम केलेले आहे.

५. कोर्ट कमिशनचा अहवाल व नकाशा निशाणी क्र.८३ मध्ये गुळुमकर

वस्तीच्या ठिकाणी निंबाळकर वस्ती असे नमुद केलेले आहे एवढीच तांत्रीक चुक आहे. याशिवाय दुसरी चुक नाही. कमिशनचे म्हणणे निशाणी क्र.८९ प्रमाणे अर्जातील बाकीचे कथन चुकीचे आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतोः–

**आदेश**

१. कमिशन अहवाल व नकाशामध्ये निंबाळकर वस्तीच्या ठिकाणी गुळुमकर वस्ती असे वाचण्यात येईल.

२. याप्रमाणे अर्ज निकाली काढला आहे.

Digitally signed by
UDAY VIJAYKUMAR
JOSHI
Date: 2023.07.14
10:26:01 +0530

स्थळ – माळशिरस. **( यु. व्ही. जोशी )**
दिनांक – १३/०७/२०२३. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.